गेले काही महिने आमच्या घरात सतत माझ्यावर लग्न करण्यासाठी दबाव टाकला जातोय. मी २८ वर्षांची तरुणी आहे. मी दोन- तीन स्थळं पाहिलीसुद्धा; पण सगळीकडून नकार आला. खरंतर मला कांदेपोहे कार्यक्रम अजिबात आवडत नाही. मुळात मला अरेंज मॅरेज करायचंच नाहीये. मला लव्ह मॅरेज करायचं आहे, पण आतापर्यंत मला तसा कुणी भेटलेला नाही हे खरंच आहे. माझ्या ग्रुपमध्ये- भावंडांमध्ये जवळपास सगळ्यांचीच लव्हमॅरेज आहेत. लव्ह मॅरेजमधली गंमत मला खूप हवीहवीशी वाटते... आणि आई- वडिल आता येता-जाता लग्नाची घाई करत आहेत. काय करू? वैदेही.

- वैदेही, मुळात आधी तू इतरांची लव्ह मॅरेज आहेत म्हणून माझंही असलं(च) पाहिजे हा विचार सोडून दे. इतरांशी तुलना करून एखादी गोष्ट करायला जाशील, तर तू ती कधीच चांगल्या पद्धतीनं करू शकणार नाहीस. त्यामुळे इतरांची लव्हमॅरेजमधली गंमत हवीहवीशी वाटते म्हणून तुला लव्ह मॅरेज करायचं आहे, की तुला पाहिजे म्हणून करायचं आहे हे मनाशी पक्कं ठरवून घे.

- आता अरेंज मॅरेजबद्दल बोलूया. वैदेही सध्याच्या परिस्थितीत अरेंज मॅरेजचा पर्याय स्वीकारण्याशिवाय मलातरी दुसरा कुठला मार्ग दिसत नाहीये. लव्ह मॅरेजच करायचं आहे म्हणून आता काही झालं, तरी ठरवून प्रेमात पडणं शक्य नाही आणि योग्यही नाही. त्यातून चुकीचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता जास्त आहे. आणि अरेंज मॅरेज म्हणजे ठरवून झालेल्या भेटीगाठी असल्या तरी प्रेमात पडण्याची सुखद भावना तिथेही असणारच ना! कदाचित असंही होईल, की सर्व बाजूंनी चांगला असलेल्या एखाद्या मुलाला भेटल्यानंतर, त्याच्याशी गप्पा मारल्यावर, एकमेकांना जाणून घेतल्यावर तू खरंच त्याच्या प्रेमात पडशील! तुला कांदे- पोह्यांचा कार्यक्रम आवडत नसेल, तर मध्यम मार्ग म्हणून तुम्ही दोघंच बाहेर भेटू शकता. आजकाल बहुतेक मुलं- मुली हा पर्याय आवर्जून ट्राय करताना दिसतात.

- अरेंज मॅरेज नको म्हणण्यासाठी कित्येक मुलींच्या मनात नकाराची भीती हे एक हमखास कारण असतं. तूही या नकारांचा अनुभव घेतला आहेस. इथं एक गोष्ट मला आवर्जून सांगायला आवडेल, की हा नकार व्यक्तीला दिलेला नसतो, तर आपल्यापेक्षा भिन्न असलेल्या व्यक्तीमत्वाला दिलेला असतो. उद्या एखादा मुलगा काही कारणानं तुला आवडला नाही, तर ही नकारच देशील ना! तेव्हा एकमेकांचे स्वभाव, विचार, आवडी-निवडी सुसंगत नसणं हे त्यामागचं कारण असतं. शिवाय, तू अरेंज मॅरेजच्या एकंदर भेटींना सकारात्मकपणे सामोरी गेलीस, तर नक्की त्याचे चांगले परिणाम घडून येतील. वैदेही तुझं वयही आता २८ आहे. वय वाढत तसं आपली तडजोड करण्याची तयारी कमी होते. विचार, स्वभाव आणखी ठाम बनत जातात आणि अपेक्षा वाढत जातात. अशा परिस्थितीत समोरचं स्थळ कितीही चांगलं असलं, तरी त्याच्याकडे सकारात्मकपणे पाहाण्याची आपली वृत्ती कमी होते. म्हणूनच तू योग्य वेळेस योग्य दृष्टीकोन ठेवून अरेंज मॅरेंजचा विचार करायला हवास असं मला मनापासून वाटतं. त्यासाठी तुला भरपूर शुभेच्छा!

-

माझं नाव अमर., मी २९ वर्षांचा आहे आणि साडेतीन महिन्यांपूर्वीच माझं लग्न झालं. लग्न अरेंज पद्धतीनं झालंय. दोन दिवसांपूर्वी पहिल्यांदाच आमच्यात कडाक्याचं भांडण झालं. भांडणानंतर माझी पत्नी रागारागाने घराबाहेर पडली... मी थांबवण्याचा प्रयत्न केला, पण तिनं ऐकलं नाही. अर्ध्या- पाउण तासानं माझ्या मोबाइलवर भराभरा एसएमएस यायला लागले तेव्हा लक्षात आलं, की जाताना ती माझं डेबिट कार्ड घेऊन गेली आहे. पुढच्या जवळपास दोन

तासांत तिनं माझ्या कार्डावरून दहा हजार रुपयांची शॉपिंग केली. मला याचा खूप धक्का बसला आहे. तिच्या स्वभावाचा हा पैलू माझ्यासाठी नवीन आणि तितकाच हादरवणारा होता. या प्रसंगापासून मी आमचं नातं पुढे कसं न्यावं किंबहुना न्यावं की नाही इतक्या टोकाचा विचार करायला लागलो आहे. मी काय करू? कृपया मार्गदर्शन करा.

- अमर, हा प्रसंग कोणत्याही सुज्ञ माणसाला धक्का बसेल, विचारात पाडेल असाच आहे. त्यामुळे तुझ्या मनात यायला लागणारे विचार चुकीचे आहेत असं अजिबात नाही. फक्त तुला आता यावर तातडीनं पावलं उचलावी लागणार आहेत. मला वाटतं, तुम्ही दोघांनी या गोष्टीवर खूपच सविस्तर बोललं पाहिजे. भांडण झाल्यावर शॉपिंगला जाऊन पैसे उडवणं ही वृत्ती योग्य नाही आणि परवडणारीही नाही. पैसे कुणाचेही गेले, तरी ते चुकीचंच आहे, मात्र तिनं तुझे पैसे खर्च केले यावरून कुठेतरी तुला धडा शिकवणं हा भाव असण्याची दाट शक्यता आहे. म्हणूनच तुम्ही दोघांनी आर्थिक बाबींवर सविस्तर चर्चा करायला हवी. या घटनेबद्दल तिनं काही पश्चाताप व्यक्त केला का किंवा तुला तुझे पैसे परत देण्याची तयारी दाखवली का याबद्दल तू काही लिहिलेलं नाहीस. तेव्हा झाल्या घटनेबद्दल तिला नेमकं काय वाटतं? पश्चाताप झालाय का? आपलं चुकलंय असं तिला वाटतंय का? की तिला या सगळ्यात काहीच वावगं वाटलेलं नाही? परत असं होऊ शकतं याची शक्यता तिच्या वागण्यात दिसते का? का? हे सगळं तिच्याशी बोलून स्पष्ट माहीत करून घे.

- झाल्या प्रसंगामुळे संपूर्ण नात्यावर प्रश्नचिन्ह लावावासा वाटणं स्वाभाविक असलं, तरी नात्याला एक संधी द्यायलाच हवी असं मला वाटतं. तुमच्या चर्चेत घरखर्च, बचत, गुंतवणूकीपासून अशा शॉपिंगपर्यंत सगळ्या मुद्द्यांवर ठाम निर्णय घ्यावास असं मला वाटतं. मुखंय म्हणजे, परत असे पैसे खर्च होतीस, म्हणून तू दबकून राहाणं किंवा भांडण टाळणं असं मुद्दाम करायला जाऊ नकोस. त्यामुळे चुकीचा संदेश जाण्याची शक्यता तर आहेच, शिवाय असं परत होतंय का हे ही तुला कळणार नाही. सविस्तर चर्चा आणि ठाम निर्णयाच्या आधारे ही गुंतागुंत सोडवता येऊ शकले असं मला वाटतं.